**संदर्भ क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२५-१२१६**
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**
**डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,**
**सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.**
**दूर.०२२-३५२५२३४६/३४७/३४८/३४९/३५०,**
**E-mail ID : sgb_sanpada@yahoo.co.in**
**दिनांक : - २४.०२.२०२५**

# आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळ मुख्य मालकांच्या वतीने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात नोंदीत झाल्यामुळे मुख्य मालक अंशदानाकरीता मंडळामार्फत आकारण्यात येणाऱ्या मुळ वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता वरील लेव्हीमध्ये ०.१०% वाढ करण्याबाबत तसेच सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि.१.१.२०२५ पासून करण्यांत येणारी सुधारणा व राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (W.C.) च्या तरतुदी लागू करण्याबाबत.**

मंडळातील नोंदीत व कार्यरत सुरक्षा रक्षकांचे हित व कायदेशीर तरतूद लक्षात घेऊन, मंडळाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात मुख्य मालकाच्या वतीने नोंदीत होण्याचा निर्णय घेतलेला आहे व त्या अनुषंगाने मुख्य मालक प्रति कामगार अंशदानाकरिता मंडळामार्फत आकारण्यात येणाऱ्या मूळ वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता वरील लेव्हीमध्ये ०.१०% वाढ करण्याबाबत निर्णय घेऊन दिनांक ६.०८.२०२४ रोजीचा ठराव पारित केलेला आहे. सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२४-७६०२, दि.६.८.२०२४ च्या आदेशान्वये दि.१ जुलै, २०२४ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/कि.वे.अ./विभ/२०२५(१)/कार्या-१०/२३२८-२३३४, दि.२०.२.२०२५, अन्वये दि.१ जानेवारी २०२५ ते दि.३० जून, २०२५ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.३,६१४.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. २४.२.२०२५ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि.१ जानेवारी, २०२५ ते दि.३० जून,२०२५ या कालावधीकरीतां रु.३,६१४.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे. नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०२३-२४६७, दि.१६ मे, २०२३ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

मंडळामार्फत कार्यरत सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी हे राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेले आहेत. त्यांचे हित लक्षात घेऊन मंडळाने उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां कामगार भरपाई अधिनियम, १९२३ ची योजना लागू करण्याचा निर्णय घेऊन दि.२.८.२०२३ रोजी ठराव पारित केलेला आहे. सबब, कामगार राज्य विमा योजनेकरीतां उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां आकारण्यांत येणारी किमान वेतन (मुळ वेतन + महागाई भत्ता), घरभाडे भत्ता, अतिकालीक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता यावरील आकारण्यांत येणारी ३.२५% लेव्ही कमी करण्यांत आली असून कामगार भरपाई अधिनियम, १९२३ योजनेकरीतां किमान वेतनाच्या १ टक्का लेव्ही आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर लेव्हीमधील बदल मंडळाच्या ERP प्रणालीत करण्यांत आलेले आहेत.

**सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक, मुख्य सुरक्षा रक्षक यांना दि.१.१.२०२५ ते दि.३०.६.२०२५ पर्यंत लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४५.३५ %) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, रजाकालीन प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ म.सु.रक्षक | १३,४५७.०० | ३,६१४.०० | ३,४१४.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २३,९८५.०० | ७,७४२.०० | ११४.०० | ३१,८४१.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १३,७३२.०० | ३,६१४.०० | ३,४६९.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,३१५.०० | ७,८६६.०० | ११६.०० | ३२,२९७.०० |

...२

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.३५% दराने व घरभाडे भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

**सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांना दि.१.१.२०२५ ते दि.३०.६.२०२५ पर्यंत लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४३.१०%) रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४,४३२.०० | ३,६१४.०० | ३,६०९.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,१५५.०० | ७,७७८.०० | ३२,९३३.०० |
| २ | सहा.सु. अधिकारी | १४,६५७.०० | ३,६१४.०० | ३,६५४.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,४२५.०० | ७,८७५.०० | ३३,३००.०० |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १५,१०७.०० | ३,६१४.०० | ३,७४४.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,९६५.०० | ८,०६९.०० | ३४,०३४.०० |
| ४ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५,५५७.०० | ३,६१४.०० | ३,८३४.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २६,५०५.०० | ८,२६३.०० | ३४,७६८.०० |

*** <u>किमान वेतन = मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता</u>**

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४३.१०% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

सबब, मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशित करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा कर्मचारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार दि.१.१.२०२५ पासून सुधारीत दराने वेतन व लेव्ही मंडळास अदा करण्यांत यावी.

सही/-
(अशोक ल. डोके)
**कामगार उप आयुक्त** व
**अध्यक्ष**
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**
**प्रति,**
**मे. ................................................, नों.क्र. ........., युनिट क्र. .........**
**....................................................................**
**....................................................................**
**....................................................................**

**This being a computerised printed copy, signature is not required.*

**REF.NO.:** SGB/DA/ALD/2025-1216
Office of the ..........
SECURITY GUARDS BOARD FOR
BRIHAN MUMBAI & THANE DISTRICT.
D-301/E-301, SANPADA RAILWAY
STATION COMPLEX, SANPADA,
NAVI MUMBAI 400 705.
Ph.No.022-35252346/347/348/349/350
**E-mail ID : sgb_sanpada@yahoo.co.in**

DATE :- 24.02.2025

# ORDER

**Sub :- Regarding increase in levy by 0.10% on Basic Wages+Dearness Allowance for payment of Labour Welfare Fund to Maharashtra Labour Welfare Board, Board is Registered as Principal Employer on behalf of all registered principle employer of the Board and Increase in the Special Allowance/Dearness Allowance & H.R.A. w.e.f. 1st January, 2025 and an application of provision of Workmen's Compensation Act, 1923 for the Security Personnel who are out of scope of ESIC Scheme.**

The Board had revised the Special Allowance/Dearness Allowance and House Rent Allowance of the registered Security Guards/Officers w.e.f. 1st July, 2024 vide this Office Order No. SGB/Chairman/2024-7602, dtd. 6.8.2024.

The Board is registered with Maharashtra Labour Welfare Board on behalf of all Registered Principal Employer of the Board, In accordance to this the Board has decided on 06.08.2024 to increase levy by 0.10% on Basic Wages & Special Allowance/Dearness Allowance to pay the contribution of Principal Employer to Maharashtra Labour Welfare Board.

The Competent Authority, under Minimum Wages Act 1948, Mumbai, vide its Order No.RW/MWA/SA/2025(1)/Desk-10/2328-2334, dtd. 20.02.2025 declared the rates of Special Allowance/ Dearness Allowance for the period from 1st January, 2025 to 30th June, 2025 @ Rs.3,614.00 p.m. In accordance to this the Board has decided on 24.02.2025 to revise the Special Allowance/Dearness Allowance and House Rent Allowance payable to the Registered Security Guards/Officers of the Board for the period from 1st January, 2025 to 30th June, 2025. Accordingly the rate of Special Allowance/Dearness Allowance of the Security Guard/Officer is Rs.3,614.00 p.m.

House Rent Allowance @ 20% on Minimum Wages (Basic Wages + Special Allowance/ Dearness Allowance) is also made applicable to the Security Guards/Officers. The rate of Basic Wages, Conveyance Allowance, Leave Travelling Allowance (LTA) & Washing Allowance will remain same as per the Order of the Board Ref. No.: SGB/Chairman/2023-2467, dtd. 16th May, 2023.

Security Supervisor, Asstt. Security Officer, Security Officers and Chief Security Officers are out of the scope of ESIC Scheme. Taking their interest into consideration, the Board has passed a resolution on 2.8.2023 deciding to apply the Scheme of Workmen's Compensation Act, 1923 to the above mentioned security personnel with retrospective effect from 1.7.2023. The Board has decided that the 3.25% levy levied on minimum wages (Basic Wages + Dearness allowance), House Rent Allowance, Leave Travelling Allowance has been reduced and levied 1% levy on the Minimum Wages for the Workmen's Compensation Act, 1923 scheme. The changes in the said levy have been made in the Board's ERP system.

**STATEMENT OF WAGES & ALLOWANCES FOR THE PERIOD FROM 1st JANUARY 2025 TO 30TH JUNE 2025**

| SN | Category | *Basic Wages | *Spl. All./ D.A. | H.R.A. | C.A. | L.T.A. | W.A. | Total Wages & Allowances | Levy @ 45.35% on Basic, Spl All Rs. | Levy @ 3.25% on HRA, LTA | Total Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Sec. Guard/ Lady Searcher** | 13,457.00 | 3,614.00 | 3,414.00 | 2,200.00 | 100.00 | 1,200.00 | 23,985.00 | 7,742.00 | 114.00 | 31,841.00 |
| 2 | **Head Guard** | 13,732.00 | 3,614.00 | 3,469.00 | 2,200.00 | 100.00 | 1,200.00 | 24,315.00 | 7,866.00 | 116.00 | 32,297.00 |

All the registered Employers who are availing services of the Registered Security Guards of the Board are hereby directed to remit the Wages and Allowances to the Board of the above 2 Categories from 1st January, 2025 at the revised rate along with the Levy @ 45.35% on Minimum Wages (Basic Wages + Special Allowance = Minimum Wages) and 3.25% on House Rent Allowance, Leave Travel Allowance and Over Time Wages in the above records.

…2

**STATEMENT OF WAGES & ALLOWANCES FOR THE PERIOD FROM 1st JANUARY 2025 TO 30TH JUNE 2025**

| SN | Category | *Basic Wages | *Spl. All. / D.A. | H.R.A. | C.A. | L.T.A. | W.A. | Total Wages & Allowances | Levy @ 43.10% on Minimum Pay Rs. | Total Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | S/Supervisor | 14,432.00 | 3,614.00 | 3,609.00 | 2,200.00 | 100.00 | 1,200.00 | 25,155.00 | 7,778.00 | 32,933.00 |
| 2 | Asstt. Sec/ Officer | 14,657.00 | 3,614.00 | 3,654.00 | 2,200.00 | 100.00 | 1,200.00 | 25,425.00 | 7,875.00 | 33,300.00 |
| 3 | Security Officer | 15,107.00 | 3,614.00 | 3,744.00 | 2,200.00 | 100.00 | 1,200.00 | 25,965.00 | 8,069.00 | 34,034.00 |
| 4 | Chief Sec/ Officer | 15,557.00 | 3,614.00 | 3,834.00 | 2,200.00 | 100.00 | 1,200.00 | 26,505.00 | 8,263.00 | 34,768.00 |

* Minimum Wages = Basic Wages + Special Allowance/ Dearness Allowance

All the registered Employers who are availing services of the Registered Security Guards of the Board are hereby directed to remit the Wages and Allowances to the Board of the above 4 Categories from 1st January,2025 at the revised rate along with the Levy @ 43.10% on Minimum Wages.

The Extra Duty Wages should be calculated double the minimum wages **for all Categories.** The Wages, Allowances and Levy thereon from 1st January, 2025 should be remitted on the basis of revised rates of wages and allowances on or before 4th day of the following month.

*For further details regarding provisions of the Act, Scheme etc., please visit our
**Website – www.securityguardsboard.in**

sd/-
(A.L. DOKE )
**DY. COMMISSIONER OF LABOUR**
**&**
**CHAIRMAN**
SECURITY GUARDS BOARD FOR
BRIHAN MUMBAI & THANE DIST.

*Copy forwarded for necessary compliance.*

To,
......................................................................
......................................................................
......................................................................

Your Registration No:............ Unit No: ...............

***This being a computerised printed copy, signature is not required.***